पुण्य नगरी

# रवळनाथमुळे महिलांच्या कर्तृत्वाला संधी : जाधव

**गडहिंग्लज : प्रतिनिधी**

श्री रवळनाथ को-ऑप. हौसिंग फायनान्स सोसायटीमुळे गडहिंग्लज परिसरातील महिलांच्या कर्तृत्वाला संधी मिळाली आहे, असे प्रतिपादन ज्योती जाधव यांनी केले. रवळनाथमार्फत आयोजित फॅशन डिझायनिंग व कापडी पिशवी तयार करणे या अभ्यासक्रमाच्या प्रशिक्षण सांगता समारंभात त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले होते.




गडहिंग्लज : प्रशिक्षणार्थींना प्रमाणपत्र वितरण करताना ज्योती जाधव. उपस्थित एम. एल. चौगुले, मीना रिंगणे, उमा तोरगल्ली यांच्यासह अन्य.

संस्थापक अध्यक्ष चौगुले म्हणाले, महिलांच्या कला कौशल्यांना वाव मिळावा त्यातून अर्थार्जन करून त्या स्वावलंबी व आत्मनिर्भर व्हाव्यात यासाठीच संस्थेने हा उपक्रम हाती घेतला आहे. त्याला राष्ट्रीय सहकारी संघाने पाठबळ दिले आहे. यावेळी सीमा साळुंखे, आरती केसरकर, शुभांगी बुटे यांनी मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमास प्राचार्य आर. एस. निळपणकर, महेश मजती, विजय आरबोळे, दत्ता पाटील, उमा तोरगल्ली, श्रद्धा निळपणकर, अलका आरबोळे, महादेवी आरबोळे, अर्चना सुळकुडे, डी. के. मायदेव उपस्थित होते. मीना रिंगणे यांनी स्वागत केले. गौरी बेळगुद्री यांनी सूत्रसंचालन केले. रेखा पोतदार यांनी आभार मानले.

Kolhapur Edition
Apr 6, 2023 Page No. 6
Powered by : eReleGo.com